International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 42 November - December - 2025

# भारतातील महिला सबलीकरण कार्यक्रम

**डॉ. सोमनाथ वसंतराव पाटील[1], वर्षा शंकरराव वाळुंज[2]**

*[1]संशोधन मार्गदर्शक,*

*साहेबराव शंकरराव ढमढेरे कला आणि वाणिज्य महाविद्यालय, तळेगाव ढमढेरे, तालुका –शिरूर, जिल्हा - पुणे.*

*[2]संशोधक विद्यार्थिनी,*

*अर्थशास्त्र संशोधन केंद्र, बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी, पुणे.*

*Corresponding Author – डॉ. सोमनाथ वसंतराव पाटील*

**DOI - 10.5281/zenodo.17987568**

**गोषवारा:**

*महिलांच्या मालमतेवर अधिकार किंवा उत्पादन साधनांवर त्यांचे नियंत्रण अल्प प्रमाणात दिसून येते. अलीकडच्या काळात महिला कुटुंबप्रमुख असणाऱ्या घरांची संख्या वाढत आहे. केवळ राजकीय आरक्षण देऊन उपयोग नाही तर पुरुषांचची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. महिला सक्षमीकरण करण्यासाठी स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करणे आवश्यक आहे. महिला सक्षमीकरण ही निसर्गाच्या सक्षमीकरणापासून स्वातंत्र्य बाब नाही व ती असूही शकत नाही. सर्व दुर्लक्षित लोक आणि देशांच्या सक्षमीकरणापासून ती वेगळी करता येत नाही. महिलांचे लढे आणि चळवळी समाजातील शांतता, पर्यावरण, कामगार, शेतकरी, मानवी अधिकार, लोकशाही विकेंद्रीकरण या विविध घटकांशी जोडणे आवश्यक आहे. तसेच समानता, न्याय, लोकशाही आणि शाश्वतता या तत्वांचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. केवळ महिलांचे नव्हे तर महिलांबाबतच्या दृष्टिकोनाचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. कारण महिला म्हणजे केवळ एक स्वतंत्र विभाग नाही. महिला समाजाचा एक महत्वाचा घटक आहेत. लष्करीकरण, मानवाधिकार, शाश्वत विकास या प्रत्येक समस्येबाबत महिलांचे मते दृष्टिकोन आणि विचार जाणून घेणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक प्रश्न हा तितकाच महत्वाचा आहे.*

***मूलभूत शब्द: महिला सबलीकरण, महिला विषयक धोरण.***

**प्रस्तावना:**

महिला सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासनाने विविध योजना राबविल्या आहेत. उदा. १६ ते ६० वयोगटातील संकटग्रस्त महिलांसाठी, शासकीय महिला वसतिगृहे उभारली आहे. स्वयंसेवी आधारगृहे, संरक्षण समुपदेशन केंद्रे, मनोधैर्य योजना, शुभमंगल सामुदायिक विवाह योजना या महाराष्ट्र शासनातर्फे राबविलेल्या योजना आहेत तर केंद्र सरकारतर्फे नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे, प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रम, स्वाधार, उज्वला या योजना राबविल्या जातात.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:**

संशोधिकेने शोधनिबंधाची पुढील उद्दिष्टे मांडली आहेत.

१. महिला सक्षमीकरण धोरणाची संकल्पना अभ्यासणे.

२. महिला सक्षमीकरण धोरणाची परिणामकारकता पाहणे.

३. महिला सक्षमीकरण विषयक कार्यक्रमांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधाचा प्रकार वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे.

**तथ्य संकलन:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम माहितीचा वापर केला आहे. शोधनिबंधासाठी आवश्यक असणारी माहिती संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे यातून घेतली आहे.

**सक्षमीकरणाचा अर्थ:**

सक्षमीकरण म्हणजे इतरांवर अधिकार सत्ता गाजवणे नाही किंवा आपल्या हिश्यापेक्षा जास्त वाट्यावर आपला हक्क सांगणे नव्हे तर सक्षमीकरण म्हणजे व्यक्तीचे लोभ, हाव, हिंसेची वृत्ती यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार इतरांनाही वाढू देण्याचा त्यांना दिलासा देण्याचा तसेच काळजी घेण्याचा अधिकार होय. न्याय, नितीतत्वे सदाचरण यासाठी लढा देण्याचा अधिकार मनाचा आंतरिक विकास करून स्वतःमध्ये शहाणपण निर्माण करण्याचा अधिकार होय.

**महिला सक्षमीकरणाचा अर्थ:**

आज महिला सक्षमीकरणासाठी सर्व स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणात योजना राबवून महिलांना सुविधा उपलब्ध करून दिला जात आहेत. परंतु आजही समाजकारणात 23 of 30 व राजकारणात स्त्रियांचे मोठ्या प्रमाणात मागासलेपण दिसून येत आहे. स्त्रीवादी चळवळीच्या मते, जो पर्यंत स्त्रिया सर्वांगीण सबल होत नाही तोपर्यंत त्यांचे शोषण थांबत नाही. महिला समाजकारण, राजकारण यांमध्ये नेतृत्व करत नाही तोपर्यंत त्या आर्थिकदृष्ट्या समृद्ध होत नाही.

"महिला सबलीकरण म्हणजे महिलांचा सता विभागणीत समान वाटा, निर्णय प्रक्रियेत योग्य स्थान आणि सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक जीवनात त्याबाबतची समानता प्राप्त होणे होय. याचाच अर्थ महिलांचा आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, उद्योग या सर्व क्षेत्रात समान सहभाग अपेक्षित आहे.

**सक्षमीकरण ही गतिशील व राजकीय प्रक्रिया:**

मानवी समाजात साधन संपत्ती आणि विचारसरणी यांच्यावर नियंत्रण मिळवून अधिकार प्राप्त करून देण्यात आले लोकांचे विचार, श्रद्धा, विश्वास इत्यादिंवर तसेच साधनसंपत्तीवर जे लोक नियंत्रण मिळवितात ते कुटुंब समूह आणि देश यावर नियंत्रण ठेवू शकतात. महिला सक्षमीकरणासाठी पितृसत्ताक विचारसरणीत बदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी नैसर्गिक, मानणी, बौद्धिक, आर्थिक, अंतर्गत साधनसंपत्तीवरील नियंत्रण महिलांकडे येणे आवश्यक आहे. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत महिलांना सामावून घेतले पाहिजे अधिकाराविषयी सध्या प्रचलित असलेले मत बदलली तर महिला सक्षमीकरण होऊन महिलांच्या जीवन मनात सुधारणा घडून येईल.

महिला सक्षमीकरण ही सातत्याने चालणारी गतिशील प्रक्रिया आहे. महिलांना दुय्यम वागणूक देणारी रचना व विचार सरणी बदलण्यासाठी त्यांची ताकद वाढवणारी आहे. सक्षमीकरणामुळे महिलांना साधनसंपतीवर आणि निर्णय प्रक्रियेवर नियंत्रण मिळवण्याची संधी उपलब्ध होईल. स्वतःचे आयुष्य कसे जगायचे हे ठरविण्याचा अधिकार मिळेल. सक्षमीकरण प्रक्रिया महिला आणि पुरुष यांच्यात सध्या

अस्तित्वात असलेले अधिकारांचे नातेसंबंध बदलविण्याचे उद्दिष्ट बाळगणारी राजकीय प्रक्रिया आहे.

महिला सक्षमीकरण अनेक प्रकारे परिभाषित केले जाऊ शकते. महिलांचे दृष्टिकोन स्वीकारणे, शिक्षण, जागरुकता, साक्षरता आणि प्रशिक्षणाद्वारे महिलांचा दर्जा वाढविणे समाविष्ट आहे. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण हे महिलांना साधनसंपत्ती, मालमता आणि उत्पन्नावर नियंत्रण ठेवल्यास, लाभ घेण्यास परवानगी देते.

**आर्थिक सक्षमीकरण:**

१९८०च्या दशकापासून आर्थिक यशासाठी नव-उदार मतवादाचा स्वीकार केला. यामध्ये स्पर्धात्मकता आणि स्वावलंबन यांना प्राधान्य दिले. स्त्रियांना अधिक औपचारिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, ज्यामुळे घरामध्ये उच्च सौदेबाजीची शक्ती मिळेल. त्यांना घराबाहेर जास्त वेतन मिळू शकेल. परिणामी महिलांना बाजारात नोकरी मिळू शकेल. सक्षमीकरण आणि लैंगिक समानता प्राप्त करणे, समाजाला देशाचा शाश्वत विकास सुनिश्चित करण्यास मदत करते. शाश्वत विकास, महिला सक्षमीकरणासह पर्यावरण संरक्षण सामाजिक आणि आर्थिक विकास स्वीकारतो. सक्षमीकरणांमध्ये महिलांना स्वतःहून निवडण्यासाठी आधिक पर्यायांचा समावेश करणे आवश्यक आहे.

रोजगारासारख्या क्षेत्रात महिला सक्षमीकरण महत्वाचे आहे. वंचित महिलांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, अडथळे यांची केवळ चर्चा न करता त्यांचे आर्थिक, सामाजिक, नैतिक सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. लिंग, वंश आणि वर्ग यानुसार उपलब्ध संधींची रचना बदलल्यास सामाजिक बदल घडून येईल. कामाच्या संधी आणि कामाचे वातावरण महिलांचे सक्षमीकरण करू शकते. कामाच्या ठिकाणी सक्षमीकरणामुळे नोकरीतील समाधान आणि कामगिरीवर सकारात्मक परिणाम होतो. कामाच्या ठिकाणी समानता असल्यामुळे सशक्तीकरणाची भावना मोठ्या प्रमाणात वाढू शकते.

**स्त्री सक्षमीकरणाच्या योजना:**

महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. काळानुसार सुसंगत बदल २००१ मधील दुसऱ्या महिला धोरणात केले. २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण जाहीर केले. या सर्व धोरणांमध्ये प्रामुख्याने स्त्रियांवरील हिंसा, अत्याचार, स्त्रिविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसार माध्यमांची भूमिका, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग स्वयंसाहाय्यता बचत गटाचा विकास यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. शासकीय, निमशासकीय यंत्रणांमध्ये स्त्रियांना नोकरीत ३०% आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५०%आरक्षण मिळते. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण व प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

**महिला धोरण:**

जागतिक स्तरावर संयुक्त राष्ट्र संघटनेने १९७५ हे वर्ष "प्रथम आंतरराष्ट्रीय महिला वर्ष" म्हणून जाहीर केले. आणि त्याचे पुढे महिला दशकामध्ये रूपांतर झाले. भारत सरकारने महिलांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक समिती गठीत केली. संयुक्त राष्ट्र संघाने १९७९ मध्ये महिलांची प्रगती वेगाने होण्यासाठी आंतरराष्ट्रीय संकेत तयार केले. त्याला "सिडो" म्हणतात. हा अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज मानला जातो सर्व सदस्य देशांना हा दस्तऐवज महिला धोरण ठरवण्यासाठी पायाभूत मानावा लागेल. महाराष्ट्र

सरकारने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. दुसरे महिला धोरण २००१ मध्ये आणि तिसरे महिला धोरण २०१३ मध्ये मांडले. तीन महिला धोरणे राबवून सुद्धा राज्यातील महिला सबलीकरणाच्या परिस्थितीत अपेक्षित बदल झाला नाही म्हणून महिला धोरणांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे.

**महिला धोरण उद्दिष्टे:**

महाराष्ट्र सरकारने २०१३ मध्ये तिसरे महिला धोरण मांडले. या धोरणाचे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत -

१. महाराष्ट्रातील महिलांचा सर्वांगीण विकास व सबलीकरणासाठी प्रगतीक दृष्टिकोन रुजवणे, पुरुषप्रधान मानसिकता बदलणे आणि स्त्री व पुरुष यांचे परस्परसंबंध अधिक सौदार्हपूर्ण व निकोप व्हावे यासाठी प्रयत्न करणे.

२. महिलांना त्यांच्या आग्रक्रमानुसार आयुष्य जगता यावे यासाठी सर्व क्षेत्रामध्ये समान संधी व त्यांना आपली उद्दिष्टे साध्य करता येण्यासाठी आवश्यक व पोषक वातावरण व साधने उपलब्ध करून देणे.

३. धर्म, वंश, जात, सत्ता प्रदेश या कारणामुळे वाढत्या हिंसेचा प्रभावी मुकाबला करण्यासाठी स्त्रियांना पाठबळ देणे.

४. स्त्रि-पुरुष जन्मदर समान ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे.

५. महिलांच्या पारंपारिक प्रतिमेला छेद देऊन आधुनिक व स्वबळावर उभी असणारी नवी प्रतिमा तयार करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे व गृहिणीच्या घर कामाला प्रतिष्ठा मिळवून देणे.

६. शासनाच्या सर्व स्तरावरील निर्णय प्रक्रिया समाजातील सर्व महिलांच्या हिताचे वा हक्कांचे संवर्धन करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे होय.

७. समाजातील मुख्य प्रवाहातून बाहेर फेकल्या गलेल्या स्त्रिया, देवदासी, देहविक्री करणाऱ्या महिला, लोक कलावंत महिला आणि तृतीयपंथी यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे तसेच महिलांवर अन्याय करणाऱ्या अनिष्ट प्रथेपासून त्यांचे मुक्तता होण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.

८. समाजाच्या विषमतामूलक रचनेमुळे विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती व अल्पसंख्यांक समुदायातील महिलांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.

९. असंघटित क्षेत्रातील कार्यरत महिलांच्या हक्कासाठी प्रयत्न करणे

१०. स्त्रियांना त्यांच्या क्षमतेचा पुरेपुर उपयोग करता यावा यासाठी घरात तसेच कामाच्या ठिकाणी हिंसाचार रहित व सुरक्षित वातावरण निर्माण करणे.

**महिला आर्थिक विकास महामंडळ:**

महाराष्ट्र शासनाने केंद्र व राज्याच्या महिलांसाठीच्या विविध योजना राबविण्यासाठी महिला आर्थिक महामंडळाची स्थापना केली आहे. हे महामंडळ महिलांना विविध व्यवसायासाठी वित्त पुरवठा करणारी राज्यस्तरीय शिखर संस्था आहे. हे महामंडळ बचत गट, वित्तीय संस्था, स्वयंसेवी संस्था आणि शासनाच्या संबंधित विभाग यामध्ये समन्वय साधण्याचे काम करते. महिला सबलीकरणामध्ये या महामंडळाचे महत्वाचे योगदान आहे.

**भारतीय महिला बँका:**

भारत सरकारच्या अर्थमंत्र्यांनी फेब्रुवारी २०१३ भारतीय महिला बँकेची स्थापना करण्याची घोषणा केली. महिला मध्ये बँकेच्या पहिल्या अध्यक्षा म्हणून उषा अनंत सुब्रमण्यम यांची नेमणूक करण्यात आली. या बँकेच्या सर्व संचालिका या महिला आहेत. देशात सध्या २८ राष्ट्रीयीकृत बँका असून एका राष्ट्रीयीकृत बँकेची भर पडली आहे. सध्या देशातील २६% महिलाच कर्ज घेतात. महिला बँकेने मार्च २०१५ पर्यंत ८० शाखा उघडण्याचा मानस होता, त्यापैकी २० शाखा ग्रामीण भागात असतील. २०२० पर्यंत बँकेच्या ७७० शाखा स्थापन केल्या जाणार आहेत. भारतातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी निश्चितपणे या बँकेचा फायदा होईल. मात्र या बँकेने आपले जाळे, ग्रामीण भारतात निर्माण करणे आवश्यक आहे. तरच तळागाळातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनतील.

**महिलांचे आर्थिक सबलीकरण**:

महिला सबलीकरणांसाठी आर्थिक घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याशिवाय त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही. सामाजिक क्षेत्रावरील खर्चात वाढ करणे आवश्यक आहे. कारण त्यामध्ये महिलांचा देखील समावेश असतो परंतु २०१५-१६ चया अर्थसंकल्पनात एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत सामाजिक क्षेत्रातील खर्च हा ३.४० टक्के वरून २.५७ टक्के इतका कमी झाला आहे.

**सारांश:**

कुटुंबाच्या समुदायाच्या व देशाच्या विकासासाठी आणि कल्याणासाठी स्त्री पुरुष समानता आणि महिलांचे सक्षमीकरण आवश्यक आहे. ज्या कुटुंबात समाजात देशात निम्मी लोकसंख्या स्त्रियांची आहे त्या कुटुंबात समाजात देशात स्त्रियांना सन्मानाने वागवले पाहिजे. भारतासह जगातल्या बहुतेक देशात स्त्री पुरुष असा भेदभाव केला जातो. निर्णय प्रक्रियेत महिलांना दूर ठेवले जाते. अधिकारांपासून वंचित ठेवले जाते या प्रमुख कारण पितृसत्ताक व पुरुषप्रधान संस्कृती होय. समाजात महिलांपेक्षा पुरुषांना श्रेष्ठ मानले जाते. साधनसंपत्ती, निर्णयप्रक्रिया आणि विचारसरणी यावर पुरुषांचे जास्त नियंत्रण असते. भारतात मानवी विकासाच्या सर्व निर्देशकांमध्ये महिलांना पुरुषांच्या तुलनेत मागील स्थानावर आहेत. भारतातील स्त्री पुरुष प्रमाण आर्यूमर्यादा पुरुषांपेक्षा कमी आहे. आरोग्य, पोषण, शिक्षण अल्प प्रमाणात दिसून येते बहुतेक महिला कमी कौशल्याच्या आणि कमी पैसे देण्याऱ्या कामावर राबत असतात. पुरुषांच्या तुलनेत त्यांचे उत्पन्न कमी दिसते.

**संदर्भसूची:**

१) मुलानी एम. यु. (नोव्हेंबर २००८), अल्प बचत नियोजन (बचत गट) डायमंड पब्लिकेशन, पुणे. पान. नं. १ ते ३.
२) साधन (२००५) स्वयंसहाय्य गट कामगिरी मोजमाप भारतीय लघुउद्योग विकास बँक पुरस्कृत चैतन्य उपक्रम.पान नं. ३ ते ५
३) मुलानी. एम. यु. (डिसेंबर २००६), ‘महिला स्वयं साहाय्यता बचतगट’ डायमंड पब्लिकेशन, पुणे. पान. नं. १ ते २६ .
४) युनुस महंमद (३१ ऑक्टोबर २००७), ‘बँकर टू द पुअर-अनुवाद’ शरद पाटील, सुविधा प्रकाशन, सोलापूर. पान नं. १ ते ३७०.
५) महिला सबलीकरण योजना.